अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ।

ज्ञान प्रबोधिनी

घडो ज्ञानाचा उद्‌बोध । भक्तिप्रेमाचा कल्लोळ ।

मासिक वृत्त

सौर कार्तिक १९३२ चे वृत्त

सौर अग्रहायण १, शके १९३२ दि. २२/११/२०१०

दृष्टिक्षेपात **ज्ञान प्रबोधिनी**

शिक्षण ग्रामविकसन संघटन संशोधन आरोग्य एकात्मता

युवक विभाग
युवती विभाग
छात्र प्रबोधन
संवादिनी
ग्रामीण संघटन
नागरी वस्ती संघटन

- संपर्क भेटी, परिचय मेळावे
- व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे
- मुलांसाठी तासिका / अभ्यासिका
- महिलांसाठी व्यवसाय कौशल्य वर्ग
- उपासना व मातृभूमी पूजन कार्यक्रम

संघटन प्रभाग

❀ युवक विभाग ❀

कोथरूड भागातील युवक दलाने आकाशकंदिल विक्रीतून मिळालेल्या नफ्यातून नंदूरबार येथे चालू असलेल्या उपक्रमातील मासेमारीसाठी नाव घेण्यास मदत केली.

छत्रपती संभाजी दलाचे निवासी शिबिर दि. १२ ते १४ नोव्हेंबर रोजी झाले. यामध्ये २० युवक सहभागी झाले होते.

अकरा दल प्रतिनिधींनी सोलापूर, हराळी केंद्राला अभ्यासदौरा म्हणून भेट दिली.

❀ युवती विभाग ❀

दिवाळीच्या सुट्टीत तीन शिबिरे घेतली —१) सौर ९ ते ११ कार्तिक (३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर) लातूर, २) सौर २० ते २२ कार्तिक (दि. ११ ते १३ नोव्हेंबर) जालना आणि ३) सौर २८ ते ३० कार्तिक (दि. १९ ते २१ नोव्हेंबर) रत्नागिरी. शिबिरे घेण्यासाठी महाविद्यालयीन युवती ५-५ जणींच्या गटांत गेल्या होत्या.

❀ स्त्री-शक्ती-प्रबोधन ❀

या वेळच्या 'समतोल' दिवाळी अंकाचा विषय 'अग्रणी भारत' असा होता. त्याचे प्रकाशन मा. श्री. आनंद आगाशे यांच्या हस्ते दि. २३ ऑक्टोबर रोजी झाले. 'अग्रणी भारता'साठी प्रसार माध्यमांची भूमिका आणि जबाबदारी' असा महत्त्वाचा विषय त्यांनी मांडला. याचवेळी स्त्री शक्ती प्रबोधन गटातर्फे १९९६ साली झालेल्या परिसंवादाच्या संकलन पुस्तिकेचेही प्रकाशन झाले. परिसंवादात स्त्रियांमधील आत्मसन्मान व आत्मसंकल्पना या मुख्य विषयाला धरून चार सत्रे आयोजित केली होती.

❀ 'प्रचीती' मेळावा ❀

पाबळ येथील विज्ञानाश्रमाचे निवेदन चीन येथे TED व्याख्यानमालेमध्ये निवेदन करण्याची संधी श्री. योगेश कुलकर्णी यांना मिळाली, तसेच गडचिरोली जिल्ह्यातील एका गावाला वनहक्क मिळण्याची देशातील पहिली घटना घडली. हे घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण काम करणाऱ्या सदस्यांमध्ये प्रचीतीचे श्री. सुबोध कुलकर्णी होते. या दोघांचेही निवेदन मेळाव्यात झाले.

❀ विस्तार केंद्रे ❀

✻ बोरीवली विस्तार केंद्र :

दि. ७ ऑक्टोबर रोजी गांधीजयंती निमित्त बीमानगर एज्युकेशन सोसायटीच्या इ. १०वीच्या ८५ विद्यार्थ्यांसाठी मातृभूमीपूजन कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक व बोरीवली केंद्राचे कार्यकर्ते उपस्थित होते. पोथीतल्या संकल्पांबरोबर इ. १०वीच्या विद्यार्थ्यांना योग्य होतील असे पाच संकल्प घेतले.

दि. १० ऑक्टोबर रोजी सोलापूरात हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर मातृशक्ती जागर उपक्रम झाला. ५००० महिलांनी या कार्यक्रमात 'श्रीसूक्त पठण व कुंकुमार्चन' केले. ज्ञान प्रबोधिनी, उद्योगवर्धिनी व पाखर संकुल या तीन संस्थांनी मिळून या उपक्रमाचे आयोजन केले होते. डॉ. स्वर्णलता भिशीकर, ॲड. अपर्णा रामतीर्थकर यांनी आपले विचार या कार्यक्रमातून उपस्थित महिलांपर्यंत पोचवले.

संशोधन प्रभाग

❀ प्रज्ञा मानस संशोधिका ❀

संशोधन : नेदरलँडस् येथील उत्रेच विद्यापीठाबरोबर सुरू असलेल्या बुद्धिमत्ता कसोटीच्या कामासाठी प्रोफेसर हॉक्सबर्गन आणि प्रोफेसर जानटर लाख हे वार्षिक भेटीसाठी आले होते.

सेवा : कांदीवली येथील ६० विद्यार्थ्यांसाठी अभिक्षमता मापनाची सत्रे झाली. I-AM CD घेणाऱ्यांसाठी एक प्रशिक्षण वर्गही झाला. कराडजवळील अतीत येथील इमर्सन कंपनीत उमेदवार कायम करण्यासाठी सुमारे १२५ जणांच्या मुलाखतींचे काम पूर्ण झाले. महिंद्र कंपनीत यावेळी मूक-बधिर व अपंग व्यक्तींचेही इतरांप्रमाणेच मनोमापन करण्याचे काम काही विशेष काळजी घेऊन औद्योगिक विभाग सदस्यांनी केले.

प्रशिक्षण : वनवासी कल्याण संचलित जनकल्याण वसतिगृहांच्या संचालकांसाठी 'मुलांच्या विकासाच्या दिशा' असे सत्र वा. अनघाताई व सौ. सुजाता होनप यांनी घेतले.

केएस्बी पंप्स् लि. चे माजी अध्यक्ष श्री. अनंत सेटलवाड यांची 'शब्द ते शक्ती' प्रकल्पाला भेट

दि. ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या काळात श्री. सेटलवाड यांची 'शब्द ते शक्ती' प्रकल्पातील गावांना व पुणे कार्यालयाला भेट झाली.

प्रथम शिवरे येथे किशोरी विकास प्रकल्पातील मुली, बचतगटाच्या विभाग प्रमुख व जिजामाता प्रबोधन केंद्राच्या सभासद यांच्या बरोबर बैठक झाली. या बैठकीला सेंट्रल बँकेच्या शिवरे शाखेच्या माजी व्यवस्थापक मा. वीणाताई पटवर्धन, ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव त्याचबरोबर नाबार्ड बरोबर सुरू केलेल्या शेतकरी मंडळाचे नऊ सभासद उपस्थित होते.

जवळपासच्या गावांमधील ११ समन्वयकांची निवेदने झाली. गावपातळीवरच्या महिला जेव्हा लाखातल्या उलाढालींच्या गोष्टी सांगतात तेव्हा त्यांनी काय शिखर गाठले आहे याचा प्रत्यय येतो. स्वतःची बँक स्थापन करण्यामागचा हेतू व त्याद्वारे करण्यात आलेली विविध कामे याची माहिती कार्यकर्त्यांनी सांगितली. प्रत्येकीने आपल्या गावातील बचतगटांची संख्या त्यातून होणारी वार्षिक उलाढाल त्यातून उभे राहण्यासाठी मिळालेला आधार व त्यातून व्यवस्थित झालेली घराची घडी अशी अतिशय मुद्देसूद निवेदने केली. बँकेशी बचतगटांची सांगड घातल्यामुळे गटाला कर्ज मिळाले व त्यामुळे दारिद्र्य रेषेखालील गटांना व्यवसायासाठी मदत मिळाली. छोट्या छोट्या अनुभवातून त्यांनी काढलेले कष्टाचे जीवन सांगितले. मा. सेटलवाडांनी विचारलेल्या प्रश्नांना सगळ्याजणींनी आत्मविश्वासाने उत्तरे दिली.

आंबवणे येथे आंबवणे प्रशिक्षण केंद्रात बैठक झाली. येथे दोन प्रशिक्षण वर्गांमधील युवतींचे दोन गट उपस्थित होते. किशोरी विकास प्रकल्पासाठी आठ गावांचे समन्वयक म्हणून युवाशक्ती गटातील आठ जणी काम करत आहेत. त्याबद्दल त्यांनी माहिती दिली. नुकत्याच संपलेल्या सहा महिन्यांच्या औद्योगिक शिवणकाम वर्गातल्या युवतींचे मनोगत कथन झाले. त्यात त्यांना पुढे काय करायचे आहे असा मनोदय व्यक्त केला.

व्यक्तिविकास ते नेतृत्वविकसन व आरोग्यासंबंधी प्राथमिक माहिती याचा समावेश जास्वंद गटाच्या अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. नाडी बघणे, थर्मामिटर लावणे अशी प्रात्यक्षिके त्यांनी करून दाखविली व विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

वेल्ह्यात व आंबवण्यात आरोग्य प्रबोधिकांसाठी चाललेल्या कामाचे निवेदन डॉ. विद्याताई व डॉ. मनिषाताईंनी केले. आरोग्याच्या संदर्भातील विविध तपासणी शिबिरे, १२५ अंगणवाडीताईंसाठी चाललेल्या आरोग्य प्रबोधनासाठीचे काम, तालुका कुपोषण-मुक्त करणे यासाठी चाललेला प्रकल्प अशी विविध कामांची निवेदने झाली. आपल्या पहिल्या होम-नर्सिंग वर्गातील नोकरी करून घर सावरणाऱ्या सौ. आशा शिळिमकर यांचे निवेदन झाले.

तेथून पुढे कुरुंगवाडी येथे श्री. पासलकर यांच्या शेताला भेट दिली. तसेच श्री. भगत यांच्या शेतातील हत्ती गवताची (नेपीअर ग्रास) लागवड पाहिली व तेथील बचतगटाची निवेदने झाली. बचतगटाच्या अर्थोत्पादनासाठी बांबू लागवडीची माहिती घेतली.

दि. ३१ ऑक्टोबरला रात्रीचा मुक्काम वेल्हे तालुक्यातील कोदवडी येथील कानडे काकांकडे (माजी सरपंच) होता. तेथे ग्रामस्थांची बैठक घेऊन गावातील समस्या व उपाय यावर चर्चा केली.

दि. १ नोव्हेंबर रोजी वेल्हे तालुक्यातील अतिशय दुर्गम भागातील हरपूड गावातील बचतगटाच्या प्रमुख व आरोग्य प्रबोधिका सुरेखाताई व ग्रामस्थांबरोबर बैठक झाली. तिथे आधी दिलेल्या सोलर दिव्यांचा उपयोग व नवीन दिव्यांचे वाटप याबद्दल श्री. सेटलवाड यांनी माहिती घेतली. किशोरी विकास प्रकल्पांतर्गत इ. १०वी तील युवतीला शाळेत जाण्यासाठी सायकल भेट दिली.

वरोती येथे ग्रामस्थांनी श्रमदानाने केलेल्या डवऱ्याला (छोटी विहीर) श्री. सेटलवाड यांनी भेट दिली व ज्यांच्या वस्तीवर अजून महाराष्ट्र राज्य वीज मंडळाची वीज पोचली नाही अशांना सोलर दिव्यांचे वाटप केले.

त्यानंतर परतीच्या वाटेवर श्रीरामनगर येथे सुरू केलेल्या बालवाचनालयाला त्यांनी भेट दिली. त्यांच्या हस्ते वाचनालयाला श्री. भावेकाका यांच्या देणगीतून पुस्तके व 'शब्द ते शक्ती' प्रकल्पातून कपाट भेट देण्यात आले.

नंतर तेथील युरीया ब्रिकेट उद्योगाला भेट दिली व हत्ती गवतापासून बायो मास पेलेटिंग मशिनचे प्रात्यक्षिक पाहिले. या प्रकल्पाची सर्व माहिती गंगोत्रीचे श्री. संतोष गोंधळेकर व डॉ. श्री. सुनील गोखले यांनी दिली. ग्रामीण ऊर्जा प्रश्नाला एक उत्तर असे हे काम आहे. या प्रयोगाचा उपयोग कसा होईल ते सांगून चुलींचे प्रात्यक्षिक पण झाले.

दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.०० वा. ग्राम विकसन प्रभाग कार्यालयामध्ये विविध प्रकल्पांमधील समन्वयक व इतर विभागातील तज्ज्ञ यांच्याबरोबर बैठक झाली. यामध्ये मा. संचालक व मा. कार्यवाह यांच्यासह १९ जण उपस्थित होते. त्यात किशोरी/युवती विकास प्रकल्पामागच्या मानसशास्त्रीय चाचण्यांबद्दल मा. वनिताताई व मा. सुजाताताईंनी निवेदन केले. तसेच संवादिनी सदस्यांनी संवादिनीच्या प्रकल्पातील सहभाग जाणवणाऱ्या अडचणी व मिळणारे फायदे यावर चर्चा केली. या बैठकीत स्वरूपवर्धिनीच्या मा. पुष्पाताई नडे उपस्थित होत्या. त्यांनी होम-नर्सिंग कोर्सची पार्श्वभूमी व त्याची उपयुक्तता याबद्दल निवेदन केले.

या पूर्ण भेटीमध्ये श्री. सेटलवाड यांच्याबरोबर मा. कार्यवाह, श्री. विवेक गिरीधारी, प्रा. सुवर्णाताई, श्रीमती बागेश्रीताई पूर्णवेळ होत्या.

दि. ८ नोव्हेंबरला संध्याकाळी युवती विभागाच्या गीतारहस्य अभ्यास शिबिराचा प्रारंभ ज्ञान प्रबोधिनीच्या संशोधन प्रशिक्षण केंद्राच्या नव्या वास्तूमध्ये पुणे येथे झाला. गीतारहस्य शिबिर आयोजण्यामागची भूमिका मा. संचालकांनी त्यांच्या सुरुवातीच्या भाषणात मांडली. एकदम गीतारहस्याचा अभ्यास करायला जड जाईल असे पूर्वानुभवावरून वाटल्याने प्रथम कै. श्री. वा. रा. कोठारी यांनी लिहिलेल्या 'गीतारहस्यसार' यावर आधारित अभ्यास शिबिराचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. हे पूर्ण वेळ निवासी शिबिर दि. ८ ते १२ नोव्हेंबर या काळात झाले.

रोज गीतारहस्यातील दोन प्रकरणांवर ज्येष्ठ युवती सदस्यांचे भाषण, एका प्रकरणावर चर्चासत्र, संध्याकाळी एका बाहेरील ज्येष्ठ वक्त्याचे व्याख्यान व शेवटी मा. संचालकांबरोबर दिवसभरातील अभ्यासावर प्रश्नोत्तरे असा दिनक्रम होता. रोज दोन सत्रे श्लोक पठण व वाचनासाठी ठेवली होती. श्लोक पठणात प्रबोधिनीच्या विविध पोथ्या व प्रबोधिनीचे विविध विचार प्रबोधनपर साहित्य यामध्ये आलेल्या गीतेतील २८ श्लोकांचा समावेश होता.

सौर १७ कार्तिक(दि. ८ नोव्हेंबर)

आजच्या युगातील व्यवहारासाठी तत्त्वज्ञान

मा. संचालकांच्या भाषणाने शिबिराची सुरुवात झाली. असा अभ्यास का व कशासाठी करावा हे मा. संचालकांनी मांडले. कार्य व अकार्य यांचे निकष काय ? ते बदलते असतात का ? ते कसे वापरायचे? याबद्दल उदाहरणे देत मांडणी केली. निश्चय-धैर्य, नीतिधैर्य, तत्त्वज्ञान-धैर्य व आत्मज्ञान-धैर्य अशा चार पैलूंची मांडणी केली.

सौर १८ कार्तिक(दि. ९ नोव्हेंबर)

कर्म जिज्ञासा

पहिल्या सत्राची सुरुवात मा. सुवर्णाताईंनी मांडलेल्या 'कर्म जिज्ञासा'' या प्रकरणाने झाली. सत्य, अहिंसा, अस्तेय, काम ,क्रोध, लोभ या प्रत्येकाच्या छटा, त्याचे प्रतिसादात्मक विचार यावर त्यांनी सोपी उदाहरणे देत विचार मांडले. कर्म, विकर्म, अकर्म यांची उदाहरणे देत समजावून सांगितले.

कर्मयोगशास्त्र

दुसऱ्या सत्रात मा. संचालकांनी 'कर्मयोगशास्त्र' यावर त्यांचे विचार मांडले. कर्मयोगशास्त्रातील अर्थ सांगत त्यांनी विषयाला सुरुवात केली. प्रेयमार्ग-श्रेयमार्ग, हित व सुख, Achievement Motivation, योग, स्वधर्म आणि लोकसंग्रह या विषयांची मांडणी केली. कर्तव्य ते धर्मसंस्थापना यातील पायऱ्यांवर विवेचन केले. सगळ्यात शेवटी ज्ञानमूलक भक्तियुक्त कर्मयोगाची मांडणी केली.

क्षेत्रक्षेत्रज्ञविचार

या विषयावर मा. सुभाषरावांनी गटचर्चा घेतली. 'कूळकायदा', कसेल त्याची जमीन असे सद्यःस्थितीतील दाखले देत गटचर्चेला सुरुवात झाली. क्षेत्र म्हणजे देह आणि त्यात असणारी चेतना तोच आत्मा, म्हणजेच क्षेत्रज्ञ ही संकल्पना सोप्या उदाहरणातून देत विषय मांडला गेला. ऐहिक सुखात न अडकता हे सिद्धांत ज्यांनी अंतःप्रेरणेने शोधून काढले ते पाश्चात्यांपेक्षा नक्कीच पुढे होते हे ही पटवून दिले.

विवेकानंद केंद्राचा कर्मयोगश्लोक संग्रह

चौथ्या सत्रात विवेकानंद केंद्राचा कर्मयोगश्लोक संग्रह यावर विवेकानंद केंद्राच्या मा. श्री. गो. ग. जोशी यांनी विचार मांडले.

गीता हा मानवतेचा ग्रंथ असे सांगून त्याच्या अभ्यासाने स्वतःचे जीवन व संस्थेचे कार्य उत्तम होऊ शकते असा विचार मांडला गेला. मानवपूजा हीच ईश्वरपूजा, काम हीच पूजा ही केंद्राची सूत्रे सांगितली.

सौर १९ कार्तिक(दि. १० नोव्हेंबर)

अधिभौतिक सुखवाद

सकाळच्या सत्रात मा. अभयाताईंनी ''अधिभौतिक सुखवाद'' हे प्रकरण विविध उदाहरणे देऊन सोप्या भाषेत मांडले. सुखवाद म्हणजे काय ? शोषण म्हणजे काय ? 'मी' केंद्रस्थानी ठेवून दुसऱ्यासाठी काय करता येईल ? या पद्धतीने मांडणी केली. सुख हे नेहमीच अनित्य असते ते टाळून पुढे जाण्याचा प्रयत्न करावा. असे सांगितले.

सुख-दुःख- विवेक

दुसऱ्या सत्रात सुख-दुःख-विवेक यावर मा. अनघाताईंनी आपले विचार मांडले. त्यांच्या मांडणीत विविध शास्त्रीय आधार देत त्यांनी वेगळ्या पद्धतीने मांडणी केली. पंचेद्रिय सुखापासून ते तृप्तीपर्यंतच्या पायऱ्या त्यांनी त्यांच्या शास्त्रीय अभ्यासाचा आधार घेऊन मांडल्या. इंद्रियगम्य, मनोगम्य व बुद्धिगम्य अशा तीन प्रकारच्या सुखाचे विवेचन केले.

क्षराक्षर विचार

या विषयावर मा. यशवंतरावांनी गटचर्चा घेतली. सांख्यमताप्रमाणे उत्पती आणि लय तसेच साम्यावस्था म्हणजे काय ? सांख्य व वेदांत यांच्यातील तुलना का ? ज्ञेय-ज्ञाता व ज्ञान यांचे विवेचन तसेच प्रकृती व पुरुष या संकल्पनांवर चर्चा झाली.

गीता रहस्य व दासबोध

चौथ्या सत्रात दासबोधाचा खूपच मोठा व्यासंग असणाऱ्या वा. सुनीतीताई सहस्रबुद्धे यांनी गीता रहस्य व दासबोध यातील विविध साम्यस्थळे अभ्यासपूर्वक मांडली. रामदासांनी सांगितलेल्या उन्मनी या पाचव्या अवस्थेबद्दल सांगितले.

सौर २० कार्तिक(दि. ११ नोव्हेंबर)

संन्यास व कर्मयोग

पहिल्या सत्रात मा. स्वातीताई दिवेकरांनी संन्यास व कर्मयोगाची अभ्यापूर्वक मांडणी केली. चित्त स्वस्थितीत ठेवणे म्हणजे काय ? आत्मज्ञानी होणे व मग संन्यासाकडे वळणे कसे साध्य करावे ? कर्म करताना फलाची आशा बाजूला ठेवावी, संन्यास व कर्मयोग दोन्ही एकमेकात कशी गुंतली आहेत हे मांडले.

कर्मविपाक व आत्म स्वातंत्र्य

दुसऱ्या सत्रात मा. संगीताताईंनी कर्मविपाक व आत्म स्वातंत्र्य याविषयीचे विचार मांडले. कर्म म्हणजे काय ? सूक्ष्म देहापासून मोक्ष कसा मिळतो ? अशा प्रश्नांना पुढे ठेवत त्यांनी विषयाची मांडणी केली. कर्माची निवड कशी महत्त्वाची तसेच प्रारब्ध कर्म व अनारब्ध कर्म उदाहरणे देत स्पष्ट केले.

अध्यात्म

दुपारच्या सत्रात मा. विसूभाऊंनी 'अध्यात्म' या प्रकरणावर गटचर्चा घेतली. ईश्वर सर्वशक्तिमान आहे असे असून तो काहीच करत नसेल तर तो दयाळू कसा ? असा प्रश्न विचारून गटचर्चेला सुरुवात केली आणि मग गुणोत्कर्ष कसा होतो ? पुढे जाऊन अनुभव व युक्तिवाद दोन्ही आधारे असलेले तत्त्व-परमात्मा याची वेदांताने केलेली मांडणी, यावर भाष्य केले. स्वधर्म ओळखणे हेच अध्यात्म हे सांगितले.

स्वाध्याय परिवाराच्या दृष्टीतून योगेश्वर कृष्ण आणि भक्तिप्रधान कर्मयोग

संध्याकाळच्या सत्रात स्वाध्याय परिवारातील मा. राजेंद्रजी खेर आले होते. 'स्वाध्याय' म्हणजे 'स्व'चा अभ्यास-विशुद्ध चैतन्य, अहं, इच्छा यावर भाष्य केले. स्वतःच्या अहम्‌ला घासून पातळ करणे व इच्छा पारदर्शी करणे किती गरजेचे आहे ते सांगितले. चैतन्याने चैतन्याजवळ जाणे म्हणजेच माणसे जोडणे हे व निष्काम कर्म करण्याचा मार्ग स्वाध्याय परिवारात कसा आहे हे सांगितले. भावफेरी, कृती भक्ती, श्रीदर्शनम्, वृक्षमंदिर इ. स्वाध्याय परिवारातील कर्मयोगावर आधारित उपक्रमांची माहिती दिली. अहंकार सोडण्यापेक्षा तो नको तेव्हा बाजूला ठेवा व हवा तेव्हा धारण करा. अपौरुषेय लक्ष्मीची कल्पना काय हे स्पष्ट केले.

सौर २१ कार्तिक(दि. १२ नोव्हेंबर)

सिद्धावस्था व व्यवहार

सकाळच्या सत्राची सुरवात मा. हर्षताईंनी मांडलेल्या सिद्धावस्था व व्यवहार या प्रकरणाने झाली. सिद्धावस्था म्हणजे संन्यास व संन्यास म्हणजे काही काहीच कर्म न करता स्वस्थ रहाणे असा अर्थ नसून ज्यांना सिद्धावस्था प्राप्त झाली आहे त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी काम केले पाहिजे. सिद्धावस्था प्राप्त झाली तरी नित्य कार्ये ही करावीच लागतात. तसेच मिळवलेले ज्ञान जर समाजासाठी वापरले नाही तर त्याचा उपोग काय ? अशा सोप्या भाषेत त्यांनी या अवघड विषयांची मांडणी केली

भक्तिमार्ग

दुपारच्या सत्रात मा. आर्याताईंनी भक्तिमार्ग या १३ व्या प्रकरणाचे विवेचन केले. कोणतेही ध्येय गाठताना कर्ममार्ग हा सुरुवातीला अवघड असतो पण त्याला भक्तिमार्गाची जोड दिली तर तो सोपा होतो. ज्ञानमार्ग हा बहुतेकांना अवघड वाटतो मग कोणता मार्ग ? तर भक्तीमार्ग. भक्ती म्हणजे काय ? बुद्धीला पटलेली गोष्ट असली तरी त्यावर विश्वास व श्रद्धा हवी तसेच ज्ञान कर्मयुत भक्ती याचे विवेचन केले.

परिसंवाद

दुपारच्या सत्रात परिसंवाद घेण्यात आला. त्यात एकूण १२ शिबिरार्थी विविध विषयांवर ४ ते ५ मिनिटे बोलल्या. त्यात कार्याकार्य विवेकाचा शत्रू मोह, भौतिक सुख आणि मानसिक सुख असे विषय होते. शिबिराच्या काळात पडलेले प्रश्न व त्यावर मिळालेली उत्तरे यावरही काही जणी बोलल्या. या परिसंवादासाठी मा. उषाताई आवर्जून उपस्थित राहिल्या होत्या. त्यांनी प्रत्येकीच्या मांडणीवर थोडेसे भाष्य केले.

उपसंहार

गीतेतल्या १५व्या प्रकरणावर दुपारच्या दुसऱ्या सत्रात मा. वामनराव अभ्यंकरांनी चर्चासत्र घेतले. संध्याकाळच्या व्याख्यानांमध्ये व केलेल्या वाचन-अभ्यासामध्ये काही संगती वाटते का ? या प्रश्नाने गटचर्चेला सुरवात झाली. प्रश्न सोडवायला एक तत्त्वज्ञान पुरेसं मग बाकीची कशाला ? त्रिविध श्रद्धा म्हणजे काय ? कर्मयोग व कर्मसंन्यास या दोन मार्गांपैकी कोणता निवडावा ? ध्येयबिंदू कोणता ? व तिथपर्यंत कसे पोहोचावे ? इ. प्रश्नांवर उत्तरे मिळणारी चर्चा झाली.

गीतारहस्य व ज्ञान प्रबोधिनी

या विषयावर मा. संचालकांनी समारोपाच्या सत्रात विचार मांडले. सुरुवातीला आप्पांच्या काही आठवणी सांगून प्रबोधिनीपणाची वृत्तीघडण कशी झाली हे सांगितले. प्रबोधिनीचे प्रवक्तेपण जपणे म्हणजे काय ? स्त्रियांमधील आत्मशक्तीच्या जाणीवेचे प्रबोधन करण्यासाठी स्त्री व पुरुष दोघांनी काम केले पाहिजे इ. विचार मांडले.

गीतारहस्य व प्रबोधिनीच्या दुसऱ्या खंडात मांडलेले 'आजच्या युगातील अद्वैत तत्त्वज्ञान', संन्यास व भक्ती याबद्दल आस्था, यावर भाष्य केले.

शिबिरात एकूण २० जणी सहभागी झाल्या होत्या. त्यात ८ महाविद्यालयीन किंवा पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या युवती होत्या. बहुतेक जणींनी 'गीतारहस्यसार' समजावून घेताना गीतारहस्यातील त्या त्या प्रकरणांचेही वाचन केले. रोजच्या रात्रीच्या प्रश्नोत्तरांच्या सत्रात दिवसभर अभ्यासातून पडलेले प्रश्न विचारले जात होते. गीता का सांगितली ? आत्म्याची संकल्पना काय ? 'पाश्चात्यांपेक्षा आपण श्रेष्ठ' हे या ग्लोबलायझेशनच्या जगात कसे पटवायचे ? अशा विविध प्रश्नांवर मा. संचालकांनी समर्पक उत्तरे दिली.